ePaper

वर्ष - 9 I अंक -60 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

# ऐन दिवाळीत ऑक्टोबर हिटसोबत जोरदार पाऊस, पुढील 4 दिवस धो-धो?




## उद्या अंक नाही

आज दिनांक 22 ऑक्टोबर रोजी **दीपावली पाडव्या**निमित्त **महाईन्यूज**च्या कार्यालयास सुटी असल्यामुळे उद्या गुरुवार दिनांक 23 रोजीचा **अंक प्रकाशित** होणार नाही. याची आमचे सर्व वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक




## डॉ. डी. वाय. पाटील

९१ वा वाढदिवस

अभिष्टचिंतन

आपल्या जीवनातील
९१ वर्षांचा प्रवास म्हणजे
प्रेरणादायी यशोगाथा आहे,
आपले मार्गदर्शन, मूल्ये आणि कार्य हे
आमच्यासाठी सतत प्रेरणास्रोत राहोत,
आपल्याला वाढदिवसाच्या अनंत
शुभेच्छा आणि दीर्घायुष्य लाभो
हीच प्रार्थना...

"दिर्घायु-शतायु-सुखायु अभिष्ट राहोत...
आमचे डी. वाय. दादा...
आमची प्रेरणा... आमची ऊर्जा...
आमच्या शक्तीचे मनःपूर्वक शुभचिंतन!

शुभेच्छुक



**डॉ. पी. डी. पाटील**

कुलपती- डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे
अध्यक्ष- डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणे
आणि डॉ. डी वाय. पाटील युनिटेक सोसायटी, पुणे

DPU

**डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे**
(अभिमत विद्यापीठ)

NIRF Ranking 4th DENTAL CATEGORY
NIRF Ranking 12th MEDICAL CATEGORY
NIRF Ranking 41st UNIVERSITY CATEGORY
NIRF Ranking 11-50 SDG INSTITUTIONS

NAAC Accredited A++ Grade 3.64

THE IMPACT RANKINGS 2025
13 Ranked globally for SDG-3
55 Ranked globally for SDG-2
80 Ranked globally for SDG-5
301-400 Overall Rank

THE 2025 Times Higher Education World University Rankings
267 Highest Ranked Pillar in Teaching
801-1000 Medical and Health (Subject)
501-600 Asia University Rankings
1201-1500 World University Rankings (2026)



**डॉ.(सौ.) भाग्यश्री पी. पाटील**

कुलपती- ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणे
प्र-कुलपती- डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे
उपाध्यक्षा- डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणे
आणि डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटी, पुणे

### डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे अंतर्गत महाविद्यालये

- डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील दंत महाविद्यालय व रुग्णालय, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील बायोटेक्नॉलॉजी अँड बायोइन्फॉरमॅटिक्स इन्स्टिट्यूट, ताथवडे, पुणे
- ग्लोबल बिझिनेस स्कूल अँड रिसर्च सेंटर, ताथवडे, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील होमिओपॅथिक मेडिकल महाविद्यालय व संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील ऑप्टोमेट्री अँड व्हिज्युअल सायन्सेस, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे ऑनलाइन लर्निंग सेंटर, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील स्कूल ऑफ अलाईड हेल्थ सायन्सेस, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील स्कूल ऑफ लिबरल आर्ट्स, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील स्कूल ऑफ डिझाईन, ताथवडे, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील स्कूल ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, ताथवडे, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील विद्यपिठाचे कौशल्य विकास केंद्र, पिंपरी, पुणे

### ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणे अंतर्गत महाविद्यालये

- स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, पिंपरी, पुणे
- स्कूल ऑफ फार्मसी अँड रिसर्च, पिंपरी, पुणे
- स्कूल ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, ताथवडे, पुणे
- स्कूल ऑफ बिझनेस अँड स्ट्रॅटेजी, ताथवडे, पुणे
- स्कूल फॉर हॉस्पिटॅलिटी अँड टुरिझम, ताथवडे, पुणे
- स्कूल ऑफ लिबरल आर्ट्स, ताथवडे, पुणे

### डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटी, पुणे अंतर्गत महाविद्यालये

- डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिटयूट ऑफ फार्मासुटिकल्स सायन्सेस अँड रिसर्च, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण महाविद्यालय, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील पब्लिक स्कूल, पिंपरी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील विज्ञान आणि संगणक विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण महाविद्यालय (बी.एड.), आकुर्डी, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नोलॉजी, ताथवडे, पुणे
- डॉ. डी. वाय. पाटील बी स्कूल, ताथवडे, पुणे
- युनिटेक बी स्कूल, ताथवडे, पुणे

ePaper
ऐन दिवाळीत ऑक्टोबर हिटसोबत जोरदार पाऊस, पुढील 4 दिवस धो-धो?




वर्ष - 9 । अंक -60 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™





www.mahaenews.com । बुधवार, दि. 22 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## लक्ष्मीपूजनानंतर हवा प्रदूषण : मुंबईच्या हवेची स्थिती गंभीर! कोर्टाच्या आदेशांची पायमल्ली

# अरारारा सगळीकडे फटाक्यांचा धूर!

## पिंपरी-चिंचवडमध्येही प्रदूषणात झपाट्याने वाढ; भूमकर चौक व निगडी परिसरात AQI 250 पार

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश आणि उत्साहाचा सण. पण या प्रकाशोत्सवाने यंदा मुंबईच्या वातावरणावर काळी छाया पसरवली आहे. लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने मंगळवारी संध्याकाळी शहरभर मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. त्याचा थेट परिणाम मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेवर झाला असून प्रदूषणाची पातळी धोक्याच्या रेषेपलीकडे गेली आहे. मुंबई, पिंपरी-चिंचवड आणि राज्यातील इतर शहरांमध्ये दिवाळीच्या निमित्ताने प्रदूषणाची पातळी धोक्याच्या स्तरावर पोहोचली आहे. पुढील काही दिवस हवामान स्थिर राहिल्यास परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. प्रशासन, तज्ज्ञ आणि नागरिक तिघांनी मिळूनच या प्रदूषणाच्या आव्हानाला सामोरे जाण्याची गरज आहे.**

मुंबई महानगर प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, मंगळवारी शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) तब्बल 211 इतका नोंदवण्यात आला. दिवसभर फटाक्यांची आतषबाजी झाल्याने रात्रीच्या वेळी हा निर्देशांक झपाट्याने वाढत गेला. काही भागांत तो 300 ते 340 पर्यंत पोहोचला. म्हणजेच हवा 'अतिशय खराब' श्रेणीत गेली आहे.



### दिवाळीचा धूर आणि मुंबईचे प्रदूषित आकाश

फटाक्यांच्या धुरामुळे हवेत कार्बन डायऑक्साईड, सल्फर डायऑक्साईड आणि सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण वाढते. हे कण श्वसन संस्थेसाठी अतिशय घातक ठरतात, असे पर्यावरण तज्ज्ञ सांगतात. विशेषतः ज्यांना दमा, एलर्जी किंवा इतर श्वसनविकार आहेत, त्यांना या काळात अधिक त्रास होण्याची शक्यता असते. मुंबईतल्या कुलाबा, बांद्रा, अंधेरी, गोरेगाव, मुलुंड या भागांमध्ये सर्वाधिक प्रदूषण नोंदले गेले आहे. या भागांमध्ये फटाक्यांची आतषबाजी सर्वाधिक झाली होती. सकाळी या परिसरात धुरकट वातावरण आणि डोळ्यांना चटका लावणारा धूर नागरिकांना जाणवत होता. अनेक ठिकाणी इमारतीदेखील धुक्यामुळे स्पष्ट दिसत नव्हत्या.

### वाऱ्याचा वेग कमी, प्रदूषण वाढणार

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवस वाऱ्याचा वेग कमी राहणार आहे. त्यामुळे हवेतील धूलिकणांचा निचरा होण्यास विलंब होईल आणि प्रदूषणाची पातळी आणखी वाढू शकते. पर्यावरण तज्ज्ञांनी नागरिकांना विनाकारण बाहेर पडू नये, घरात एअर प्युरिफायरचा वापर करावा, तसेच बाहेर जाताना मास्क घालण्याचा सल्ला दिला आहे. मुंबई महानगर प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाने सांगितले की, "फटाक्यांमुळे सल्फर डायऑक्साईडची पातळी 2 वरून 4 वर गेली आहे, तर PM 2.5 चे प्रमाण धोक्याच्या पातळीवर पोहोचले आहे."

### मुंबईतील AQI पातळी (लक्ष्मीपूजनानंतर):

| भाग | AQI निर्देशांक | स्थिती |
|---|---|---|
| मुंबई (सरासरी) | 234 | खराब |
| भांडूप | 147 | मध्यम |
| कुलाबा | 173 | मध्यम |
| मालाड | 309 | अतिशय खराब |
| माझगाव | 267 | खराब |
| वरळी | 134 | मध्यम |
| बोरिवली | 307 | अतिशय खराब |
| बीकेसी | 312 | अतिशय खराब |
| चेंबूर | 337 | अतिशय खराब |
| अंधेरी | 174 | मध्यम |
| नवी मुंबई | 184 | मध्यम |

### पिंपरी-चिंचवडमधील AQI पातळी (लक्ष्मीपूजनानंतर):

| भाग | AQI निर्देशांक | स्थिती |
|---|---|---|
| निगडी | 252 | वाईट |
| भूमकर चौक | 226 | वाईट |
| भोसरी | 197 | वाईट |
| आळंदी | 135 | मध्यम |

### कोर्टाचे आदेश धाब्यावर

मुंबई उच्च न्यायालयाने दिवाळीच्या काळात रात्री 10 नंतर फटाके फोडण्यास बंदी घातली होती. तरीही मंगळवारी रात्री उशिरापर्यंत नागरिकांनी फटाके वाजवले. पोलिस आणि पालिका प्रशासनाकडून काही ठिकाणी कारवाई करण्यात आली असली तरी अनेक भागांत नियमांचे उल्लंघन उघडपणे झाले. ध्वनी प्रदूषणही वाढले असून, सुतळी बॉम्ब आणि उच्च डेसिबलच्या फटाक्यांनी रात्रीची शांतता भंग केली. शहरातील नागरिकांनी समाजमाध्यमांवरूनही प्रदूषण आणि आवाजाबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

### ॲपद्वारे हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण

'सफर' आणि 'एअर क्वालिटी इंडेक्स इंडिया' या ॲप्सद्वारे मुंबई व उपनगरांतील हवेची गुणवत्ता नोंदवली जाते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सकाळी "मध्यम" असलेली हवा संध्याकाळी "वाईट" आणि रात्री "अतिवाईट" श्रेणीत गेली. सायंकाळी 6 नंतर फटाक्यांची आतषबाजी सुरू झाल्यानंतर प्रदूषण झपाट्याने वाढल्याचे आकडे सांगतात.

महाईन्यूज

### महाईन्यूजचा नागरिकांसाठी संदेश

मुंबई व पिंपरी-चिंचवडमधील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी जबाबदारीने सण साजरा करण्याची गरज आहे. प्रदूषणविरहित दिवाळीचा संकल्प घेऊन पर्यावरणपूरक दिवे, फुलझड्या किंवा इलेक्ट्रॉनिक रोषणाईचा वापर करावा.दिवाळीचा आनंद राखताना आपले आणि शहराचे आरोग्य जपणे हेच खऱ्या अर्थाने "प्रकाशोत्सवाचे खरे यश" ठरेल.

### पिंपरी-चिंचवडमध्येही प्रदूषणाचा वाढता कहर

पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या औद्योगिक शहरांमध्येही दिवाळीच्या फटाक्यांमुळे प्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. एकेकाळी स्वच्छ हवेसाठी ओळखले जाणारे हे शहर आता प्रदूषणाच्या विळख्यात सापडले आहे. भूमकर चौक, निगडी, भोसरी या ठिकाणी AQI 200 च्या पुढे नोंदवण्यात आला आहे. शहरातील रस्त्यांवर, मैदानांवर आणि सोसायट्यांमध्ये झालेल्या फटाक्यांच्या रोषणाईमुळे मोठ्या प्रमाणात धूर पसरला. पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, "या धुरामुळे दीर्घकालीन आरोग्य समस्या वाढू शकतात.

### आरोग्य तज्ज्ञांचा इशारा

डॉक्टरांच्या मते, दिवाळीनंतरचा हा काळ श्वसनविकारांसाठी संवेदनशील असतो. धूर, धूळ आणि आर्द्रतेमुळे दमा, खोकला, सर्दी आणि डोळ्यांची जळजळ वाढते. "ज्यांना आधीपासूनच दमा किंवा एलर्जी आहे, त्यांनी औषधे नियमित घ्यावीत.

## मस्तानीच्या मुलाची कबर

## मस्तानी शनिवार वाड्यात आलीच नाही- बलकवडे

# ‘ती’ कबर मस्तानीच्या मुलाची?

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील शनिवार वाडा परिसरात सामूहिक नमाज पठण झाल्याचा आरोप भाजपाच्या राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी केला. त्या संदर्भातील काही पुरावेही त्यांनी समाजमाध्यमांवर शेअर केले. हा प्रकार समोर येताच हिंदू संघटनांनी आक्रमक पवित्रा घेत परिसरात आंदोलने केली. या आंदोलनादरम्यान शनिवार वाड्याला लागून असलेली कबर हटवण्याची मागणी करण्यात आली.**

## मकबूल हुसैन मदनी कोण होता?




नेमकी ही कबर कुणाची आहे? या कबरीचा इतिहास काय? असे प्रश्न असंख्य प्रश्न उपस्थित केले जात आहेत. याबाबत इतिहासाचे अभ्यासक पांडुरंग बलकवडे यांनी साम टीव्हीशी संवाद साधला. त्यांनी या कबरीबाबत काय सांगितले? ते जाणून घेऊ साम टीव्हीशी संवाद साधताना पांडुरंग बलकवडे म्हणाले, “मुळात या घटनेचे दोन भाग आहेत. त्यातील पहिला भाग हा शनिवार वाड्याला मिळालेल्या राष्ट्रीय स्मारकाचा आहे. या ऐतिहासिक वास्तूच्या आत काही बुरखाधारी महिलांनी सामूहिक नमाज पठण केल्याचा प्रकार समोर आला. खरेतर शनिवार वाड्यात आजपर्यंत नमाज पठण करण्याची कोणतीही घटना घडल्याची नोंद नाही. मुळात राष्ट्रीय स्मारकात कुणालाही अशा प्रकारचा धार्मिक कार्यक्रम करण्याची परवानगी नाही, तरीहीदेखील ही घटना घडल्याने त्याकडे पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष झाले असावे असे मला वाटते, त्यामुळे सरकारने या प्रकरणाचा योग्य पद्धतीने विचार केला पाहिजे.”पुढे बोलताना बलकवडे म्हणाले,“शनिवार वाड्याच्या उत्तर बाजूला दिल्ली दरवाजा आणि त्या शेजारीच मस्तानी दरवाजा आहे. या लहान दरवाजासमोर एक कबर आहे. गेल्या २०० वर्षांपासून त्या कबरीजवळ एक बोर्ड उभा असून त्यावर मकबूल हुसैन मदनी असे नाव लिहिण्यात आलेले आहे. त्यावरील तारखेवरून असे लक्षात येते की, १८२९ साली ही कबर उभारण्यात आली आहे. मुळात मकबूल हुसैन मदनी ही व्यक्ती कोण होती याची नोंद ब्रिटीशकालीन इतिहासातही सापडत नाही, त्यामुळे ही कबर खरेच त्या काळातील आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. माझ्या समजुतीनुसार मी शनिवार वाड्याच्या अगदी जवळ राहतो. गेल्या ५० ते ६० वर्षांपासून ही कबर इथे असल्याची नोंद आहे. या कबरीवर बसविण्यात आलेल्या टाईलही अगदी आधुनिक आहे.”देशात जिथे जिथे राष्ट्रीय स्मारके आहेत, तिथे ब्रिटीश काळामध्ये अशा प्रकारच्या वादग्रस्त वास्तू उभ्या आहेत. कारण दोन समाजात या वास्तूंवरून तेढ निर्माण झाल्याने त्याचा फायदा ब्रिटीशांना होऊ शकत होता, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. मला आठवतंय, मी लहान असताना या कबरीजवळ कोणताही बोर्ड नव्हता. त्यावेळी असे सांगितले जात होते की, मस्तानीचा मुलगा समशेर बहादूर याची ही प्रतिकात्मक समाधी आहे. त्याने पानिपतच्या युद्धात सहभाग घेतला होता. मात्र, जखमी झाल्याने त्याचा तिथेच मृत्यू झाला, अशी इतिहासात नोंद आहे. त्याच्या स्मरणार्थ शनिवार वाड्याजवळ ही कबर बांधली गेली अशी त्यावेळी समाजामध्ये वार्ता होती. गेल्या १० ते २० वर्षांपासून इथे लावण्यात आलेली ही पाटी काल्पनिक आहे. याविषयी कुठलाही पुरावा नाही आणि जर असेलच तर त्यांनी ते निश्चितच सरकारसमोर मांडले पाहिजे.”सध्या शनिवार वाड्यात असलेल्या या कबरीची जागा पुरातत्व खात्याच्या अखत्यारीतील आहे, त्यामुळे अशा जागेवर कोणतेही धार्मिक कार्यक्रम झाल्याची इतिहासात नोंद नाही. १० जानेवारी १७३० रोजी शनिवार वाड्याचे भूमिपूजन झाले.

## पांडुरंग बलकवडे काय म्हणाले?

आणि २२ जानेवारी १७३२ रोजी त्याची वास्तूशांती झाली. मुळात मस्तानी शनिवार वाड्यात आल्याची नोंद नाही. कोथरूडमध्ये त्यांना स्वतंत्र राहण्याची व्यवस्था करून देण्यात आली होती, अशी कागदोपत्री नोंद आहे. समशेर बहादूर आणि पेशवे कुटुंबीयांचे जवळचे नाते होते. उत्तर हिंदूस्तानच्या राजकारणात तो पेशवे कुटुंबीयांचा प्रतिनिधी म्हणूनच होता.

# कंपनीच्या नावे बनावट पादत्राणांची विक्री

## पादत्राणे विक्री करणाऱ्या तीन दुकानदारांविरुद्ध कारवाई

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पादत्राणे निर्मिती करणाऱ्या नामवंत कंपनीच्या नावे बनावट पादत्राणांची विक्री करण्यात येत असल्याचा प्रकार दिवाळीमध्ये उघडकीस आला. कंपनीतील अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती पोलिसांना दिल्यानंतर रास्ता पेठेतील पादत्राणे विक्री करणाऱ्या तीन दुकानदारांविरुद्ध कारवाई करण्यात आली.**



या कारवाईत एक लाख दहा हजार रुपयांचे बनावट पादत्राणे जप्त करण्यात आले. या प्रकरणी पादत्राणे विक्री करणाऱ्या तीन दुकानदारांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. याबाबत पादत्राणे निर्मिती करणाऱ्या कंपनीतील स्वामित्व हक्क विभागाची जबाबदारी सांभाळणारे अधिकारी निखिल पाटील यांनी समर्थ पोलीस ठाण्यात दिली आहे.रास्ता पेठेत पादत्राणे विक्रीची दुकाने आहेत. घाऊक, तसेच किरकोळ स्वरुपात या भागात पादत्राणे विक्रीचा व्यवसाय केला जातो. या भागातील तीन पादत्राणे विक्री करणारे दुकान पादत्राणे निर्मिती करणाऱ्या नामवंत कंपनीच्या नावे बनावट पादत्राणांची विक्री करत असल्याची माहिती पाटील यांना मिळाली. त्यानंतर त्यांनी याबाबतची माहिती समर्थ पोलिसांना दिली.पोलिसांनी तीन दुकानांवर कारवाई करुन तेथून एक लाख दहा हजार रुपयांचे पादत्राणे जप्त केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते, गुन्हे शाखेचे निरीक्षक चेतन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक शेंडगे तपास करत आहेत.सणासुदीच्या काळात नामवंत कपडे, पादत्राणे निर्मिती करणाऱ्या उत्पादकांच्या नावे बनावट उत्पादनांची विक्री करण्यात येत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत.

## बनावटे उत्पादनांची स्वस्तात विक्री

नामवंत उत्पादनांच्या बनावटे उत्पादनांची स्वस्तात विक्री केली जाते.बनावट टी शर्ट, जीन, पादत्राणे परराज्यातून पुणे, मुंबईतील बाजारपेठेत विक्रीस पाठविली जातात. यापूर्वी पोलिसांनी शहरातील वेगवेगळ्या भागातील दुकानदारांविरुद्ध कारवाई केली होती. नामवंत कंपन्यांच्या नावे तयार करण्यात आलेला लाखो रुपयांची बनावट उत्पादने पोलिसांनी जप्त केली होती.पादत्राणे निर्मिती करणाऱ्या नामवंत कंपनीच्या नावे बनावट पादत्राणांची विक्री करण्यात येत असल्याचा प्रकार दिवाळीमध्ये उघडकीस आला.

**न्यायालयीन कामकाज : वकील आणि पक्षकारांना पौड येथे हेलपाटे मारावे लागत आहेत**

# पौड न्यायालयात हिंजवडी आणि वाकडचे खटले

## वकील, न्यायालयीन कर्मचाऱ्यांची गैरसोय

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: पौड येथे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय स्थापन करण्यात आले आहे. त्यामुळे मुळशीतील खटले तेथे निकाली काढले जात आहेत. तर, पिंपरी चिंचवड शहरातील हिंजवडी आणि वाकड पसिरातील खटलेही या कोर्टात चालतात. यापूर्वी हिंजवडीचा अर्धा भाग शिवाजीनगर कोर्ट आणि वाकडचा अर्धा भाग पिंपरी कोर्टात चालविला जात होता. मात्र, वाकड आणि हिंजवडीतील खटले आता पौड न्यायालयात चालविले जात आहेत. त्यामुळे वकील आणि पक्षकारांना पौड येथे हेलपाटे मारावे लागत आहेत.**




हिंजवडी व वाकड परिसर हा आयटी पार्क, निवासी आणि व्यापारी केंद्रांमुळे अतिशय वेगाने विकसित झाला आहे. हजारो कुटुंबे येथे वास्तव्यास आहेत. मात्र, या भागातील नागरिकांना आता पौडरोड न्यायालयापर्यंत पोहोचण्यासाठी सुमारे २५ किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. वाहतूक कोंडी, सार्वजनिक वाहतूक कमी आणि प्रवासाचा जास्त वेळ यामुळे दिवसभर वेळ जातो. अनेक पक्षकारांना कामाच्या वेळात कोर्टात उपस्थित राहणे कठीण जाते. पिंपरी न्यायालय हे हिंजवडी आणि वाकडपासून सरासरी दहा ते १२ किलोमीटर अंतरावर आहे. अनेक वर्षे वाकड येथील भागातील खटले पिंपरी न्यायालयात चालत होते. परंतु पौड येथे नवीन न्यायालय स्थापन झाल्यानंतर हे खटले तेथे नेण्यात आले. पिंपरी न्यायालय जवळ असूनही आता त्यांना पौडपर्यंत जावे लागते. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिवसभर काम करणारे कर्मचारी यांना न्यायालयात उपस्थित राहणे अधिकच कठीण झाले आहे.

वकील, न्यायालयीन कर्मचाऱ्यांचीही अडचण पौड न्यायालयात जावे लागत असल्यामुळे पक्षकार आणि नागरिकांसह वकील व न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वकील पिंपरी न्यायालयात कार्यरत आहेत. आता त्यांना पौड येथे रो जा करावी लागत असल्याने वेळ आणि प्रवास खर्च वाढला आहे

> “ वाकड हिंजवडी भाग आयटी परिसर आहे. कामाच्या व्यापामुळे येथील नागरिकांना वेळात वेळ काढून पौड गाठावे लागते. बऱ्याचदा यामुळे रजा घ्याव्या लागत आहेत. परिणामी, मानसिक आणि आर्थिक ताण सहन करावा लागत आहे.
> **- ॲड. केतन झगडे,** ज्येष्ठ विधितज्ञ.

**स्थानीय लोकप्रतिनिधींकडे मागणी**

हिंजवडी-वाकड परिसराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्र न्यायालय स्थापन करावे.किमान अंतर ठेवून न्यायालयीन सोयी पिंपरी किंवा हिंजवडी परिसरात उपलब्ध कराव्यात. न्यायालयीन सुविधा जवळ असाव्यात पौडरोड न्यायालय स्थापनेमुळे ग्रामीण भागातील सोयी वाढल्या असल्या, तरी हिंजवडी-वाकडसारख्या शहरी भागातील लोकांसाठी ही रचना त्रासदायक ठरत आहे.न्यायालयीन सोयी जवळच्या भागात मिळाव्यात, ही नागरिकांची मागणी अधिकाधिक जोर धरत आहे.

# शहरातील विद्यार्थी गिरविणार खगोलशास्त्राचे धडे!

## पिंपरी पालिका सात शाळांमध्ये उभारणार “अस्ट्रोनॉमी लॅब” ; 2 कोटी 49 लाखांचा खर्च

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सात शाळेत खगोलशास्त्राचे शिक्षण व ज्ञान मिळण्यासाठी शाळांमध्ये अस्ट्रोनॉमी लॅब (अत्याधुनिक सायन्स लॅब) विकसित करण्यात येणार आहे. एका लॅबसाठी ३६ लाखांचा करण्यात येणार आहे. एकूण २ कोटी ५० लाख रूपये खर्च अपेक्षित आहे.**






महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राचे शिक्षण व ज्ञान मिळण्यासाठी शाळांमध्ये “लोकनेते आमदार लक्ष्मण जगताप अस्ट्रोनॉमी लॅब” विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी तीन कोटी रूपयांचा निधी उपलब्ध आहे. त्यासाठी प्राथमिक शिक्षण संचालकाच्या २४ सप्टेंबर २०२४ अन्वये तांत्रिक आदेशानुसार मान्यता प्राप्त झालेली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाचे उपसचिव यांनी प्रस्तावित कामकाजास २ कोटी ५० लाख रूपये खर्चास प्रशसाकीय मान्यता दिली आहे. महापालिका शाळेत अस्ट्रोनॉमी लॅब विकसित करण्यासाठी निविदा महाटेंडर प्रणालीवर १३ जुलै २०२५ ला प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यात तीन पुरवठादार ठेकेदारांनी सहभाग घेतला होता. पुण्यातील एज्यूनीडस या एजन्सीची एका शाळातील अस्ट्रोनॉमी लॅबसाठी ३५ लाख ७१ हजार ३०० रूपयांचा लघुत्तम दर स्वीकृत करण्यात आला आहे. सात शाळांचा खर्च एकूण २ कोटी ४९ लाख ९९ हजार १०० रूपये इतका आहे.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महापालिकेच्या अकरापैकी सात शाळांमध्ये या लॅब विकसित करण्यात येणार आहेत. एका लॅबमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे एकूण ६४ प्रकाराचे प्रकल्प असणार आहेत.

शिक्षण विभागाच्या मागणीनुसार मध्यवर्ती भांडार विभागाकडून ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्या खर्चास आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे.

# प्राधान्य हवे महिला-मुलांच्या सुरक्षिततेला




**राज्यात विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारकडून 'लाडकी बहीण योजने'ची जोरदार जाहिरात सुरू आहे. अडीच कोटी महिला मतदारांच्या खात्यात निवडणुकीच्या आधी चार महिन्यांचे पैसे जमा झालेले आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिलांना नेमके काय हवे आहे, याची चर्चा न होता, महिलांची अशी मागणी नसताना सरकारी तिजोरीतून हे पैशांचे वाटप झाले आहे.**

अशा अनुत्पादक योजनांवर अतिरेकी खर्च केल्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था कोसळली आहे.वास्तविक राज्यातील सर्वच महिलांना सुरक्षितता हवी आहे. महाराष्ट्रात दररोज महिला अत्याचारांच्या १२१ आणि लहान बालकांवर होणाऱ्या अत्याचारांच्या ५५ तक्रारी दाखल होतात. यात गंभीर स्वरूपाच्या अत्याचारांचे प्रमाण मोठे आहे. २०२१ च्या तुलनेत २०२३ मध्ये महिला व बालकांवरील अत्याचारांचे प्रमाण वाढले आहे. गेल्या महिन्याभरात अल्पवयीन मुलींच्या अपहरणाच्या ८९ तक्रारी नोंदवल्या गेल्या. गेल्या आठ महिन्यांत राज्यातून २६ हजार महिला, तरुणी बेपत्ता झाल्या आहेत. जानेवारी २०२३ ते जुलै २०२४ या काळात ८० लहान मुले गायब आहेत. बेपत्ता झालेल्या १८ वर्षांखालील मुलींची संख्या सहा हजारांपेक्षा अधिक आहे. राज्यात महिला असुरक्षित आहेत याचा



ही आकडेवारी म्हणजे आरसाच आहे.मुख्यमंत्र्यांच्या ठाणे जिल्ह्यात गेल्या पाच महिन्यांत महिलांवरील अत्याचाराचे १४६ गुन्हे दाखल झाले आहेत. विनयभंगाची २५३ प्रकरणे उघडकीस आली आहेत. जुलै महिन्यामध्ये ठाण्याजवळील शिळफाटा येथील मंदिरातील तीन पुजाऱ्यांनी एका महिलेवर मंदिर परिसरात लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केली होती. उरणमध्ये देखील एका तरुणीची अशीच अत्याचार करून निर्घृण हत्या करण्यात आली. मे २०२४ च्या अखेरपर्यंत मुंबई पोलिसांनी पोक्सो बाललैंगिक अपराधांपासून संरक्षण अंतर्गत कायद्याप्रमाणे ५०९ गुन्हे नोंदवले आहेत. गेल्या वर्षी या काळात ४६५ गुन्ह्यांची नोंद झाली होती. मुंबईत विद्यार्थ्यांवर लैंगिक अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.१३ ऑगस्ट २०२४ रोजी बदलापूर येथील शाळेतील दोन मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेचे पडसाद राज्यभर उमटले. त्यानंतर २२ ऑगस्टपर्यंत महाराष्ट्रात अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या पुणे, अकोला, मुंबई, लातूर, नाशिक, कोल्हापूर, नागपूर या शहरांमध्ये दहा घटना घडल्या. हा लेख लिहित असताना २५ ऑक्टोबरला चिचोंडी पाटील, ता. नगरच्या अंगणवाडी सेविकेची अंगणवाडीत विनयभंग करून निर्घृण हत्या झाली. निवडणूक प्रचारात विरोधकांच्या कुटुंबातील स्त्रियांविषयी बोलताना काही पुढाऱ्यांचे भान सुटलेले आहे. राज्यात लाडक्या बहिणींच्या, स्त्रियांच्या व अल्पवयीन मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बदलापूर घटनेतील आरोपीला तळोजा तुरुंगातून बदलापूरला नेत असताना पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत तो ठार झाला. या घटनेनंतर महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांचे पिस्तूल हातात घेऊन 'बदला पूरा' असा मजकूर असलेले पोस्टर्स लागले होते. हे सत्ताधाऱ्यांनी झुंडशाहीचे केलेले उघडउघड समर्थन आहे. वास्तविक कायद्याच्या चौकटीत गुन्ह्यांचा संवेदनशीलतेने तपास करणे, योग्य साक्षी पुरावे गोळा करणे आणि न्यायालयात आरोपपत्र दाखल करून गुन्हेगाराला शिक्षा होईल असे काम करण्याची जबाबदारी पोलिसांवर असते. पोलीस न्यायाधीश होऊन लोकांना मारायला लागले तर न्याययंत्रणा व लोकशाही धोक्यात येते. बलात्कारासारखे अत्याचार घडतात तेव्हा जनतेतून आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी केली जाते. आहे. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी ज्या पद्धतीने फाशी आणि चकमकीचे समर्थन केले ते म्हणजे संसदीय पदाच्या मर्यादांचा भंग होता.यानिमित्ताने फाशीच्या शिक्षेच्या संदर्भात चर्चा होणे गरजेचे आहे. आपल्या देशात संविधान निर्मितीपासून कायमच फाशीच्या शिक्षेबाबत गंभीर चर्चा झालेली आहे. २०१२ मध्ये दिल्लीतील निर्भया अत्याचारानंतर तत्कालीन केंद्र सरकारने मानवाधिकार आयोगाचे पूर्वअध्यक्ष अत्याचारासंबंधीच्या कायद्यात दुरुस्तीसाठी समिती नेमली होती.

## प्रासंगिक »

### भार विद्येचा

***अमेरिकेच्या शहराशहरांत ट्रम्प यांचा निषेध हजारोंच्या उपस्थितीत होऊ लागलेला आहे; त्यात अमेरिकावासी भारतीय सध्या तरी मोठ्या प्रमाणावर दिसत नाहीत***

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची जाहीर विधाने आणि पूर्वी रेकॉर्ड अडकण्याचे व्हायचे तसे प्रकार यांत विलक्षण साम्य दिसते. भारताने यापुढे रशियाकडून तेल खरेदी न करण्याचे निर्णय घेतल्याचे विधान अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा केले. यातून हे साम्य पुन्हा समोर येते. याआधी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध आपण थांबविले हे विधान त्यांनी आतापर्यंत ३५ वेळा वा अधिक प्रसंगी केल्याचे आढळेल. त्यात तुलनेत भारत-रशिया तेल खरेदीबाबतचे विधान तूर्त तीन वेळाच झालेले आहे. पण हे तीनही प्रसंग दोन दिवसांतील आहेत. सर्वसाधारण कोणी इसम असता तर दोन दिवसांत तीन वेळा म्हणजे दोन महिन्यांत किती वेळा असे काही त्रैराशिक मांडताही आले असते. पण ट्रम्प यांच्याबाबत तीही सोय नाही. गडी कोणत्याच समीकरणात बसत नाही.

महाराष्ट्र सरकारने राज्यातील आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांच्या गरजांचा नीट विचार करत त्यांना नेहमीच अत्यंत चांगली वागणूक दिली आहे. सेवानिवृत्त होऊ घातलेल्या आयएएस – आयपीएस अधिकाऱ्यांना सरकारी जमिनी ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर दिल्या जात असत.

# मला अखेरपर्यंत याच घरात रहायचे आहे...

त्या घेऊन हे अधिकारी सहकारी गृहनिर्माण संस्था तयार करतील आणि त्या जागेच्या आकारमानानुसार १४ ते २० फ्लॅट्स किंवा त्याहून अधिक सदनिका असलेली इमारत बांधतील, अशी कल्पना त्यामागे होती.उदाहरणार्थ मी राहतो त्या सोसायटीमध्ये, २० आयपीएस अधिकारी एकत्र आले आणि प्रत्येकाने तीन लाखांहून अधिक खर्च करून तळमजला अधिक दहा मजल्यांची इमारत बांधली, प्रत्येक मजल्यावर दोन फ्लॅट होते. सरकारच्या नियमानुसार प्रत्येक थ्री बीएचके फ्लॅटचे चटई क्षेत्र (कार्पेट एरिया) १,०७० चौ.फूट आहे. सोसायटी दरवर्षी सरकारला भाडे देते, तसेच मुंबई महानगरपालिकेला घरपट्टी भरते.सर्व सोसायट्या सह-निबंधकांकडे नोंदणीकृत आहेत. प्रत्येक सोसायटीमध्ये सदस्यांच्या संख्येनुसार निवडून आलेला अध्यक्ष, एक सचिव आणि पाच ते आठ समिती सदस्य असतात. गृहनिर्माण संस्थेच्या नियमांनुसार व्यवस्थापकीय समितीला सोसायटी किंवा तिच्या



सदस्यांच्या सामान्य समस्यांचे निराकरण करण्यासाठी दर महिन्याला बैठक घेणे बंधनकारक असते.सरकारी भाडेपट्ट्याच्या जमिनीवर सोसायट्या असल्याने त्यांना कोणत्याही बाबतीत मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करावी लागते आणि फ्लॅट मालकाच्या मृत्यूनंतर फ्लॅटच्या विक्रीसाठी किंवा वारस हक्कांसाठी त्यांची मंजुरी घ्यावी लागते. एखाद्या फ्लॅट मालकाला त्याचा/ तिचा फ्लॅट भाड्याने द्यायचा असेल तर ते तो फक्त सरकारला भाड्याने देऊ शकतात. मग सरकार तो फ्लॅट सरकारी अधिकाऱ्यांना नाममात्र भाड्याने देते. भाड्याचे पैसे फ्लॅट-मालकाच्या बँक खात्यात जमा केले जातात. अलीकडेच, आमदारांनीही त्यांनाही अशा पद्धतीने फ्लॅट मिळावेत अशी मागणी केली आणि सरकारने त्यांनाही भाडेतत्त्वावर जमीन दिली. त्यांनी सरकारने घातलेल्या अटींकडे दुर्लक्ष करत जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय सदनिका विकल्या किंवा भाड्याने दिल्या. तशी प्रकरणे नोंदवली गेली आहेत. राजकारण्यांना शिस्त लावणे सरकारला अवघड गेले. त्याऐवजी, सरकारने सर्वांसाठी नियम शिथिल केले आणि जे सरकारी कर्मचारी नव्हते (परंतु ज्यांना बाजार दर देणे परवडत होते) त्यांना ते फ्लॅट्स विकायला आणि ते भाड्याने द्यायला आमदारांना परवानगी दिली. भाडेतत्त्वाने दिलेल्या सरकारी जमिनीवर बांधलेल्या फ्लॅट्सचा व्यापार सुरू होण्याची ही नांदी होती. सध्याच्या भाजपप्रणित सरकारने तर त्याच्याही एक पाऊल पुढे टाकले आहे. सोसायट्यांना भाडेपट्ट्यावरील जमीन मालकी पट्ट्यात रूपांतरित करण्यासाठी जमिनीच्या मूल्याच्या पाच टक्के नाममात्र दराने दिली जाईल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

संस्कृती जपली पाहिजे

प्रशांत किशोर यांचा भाजपावर गंभीर आरोप

# पुरुषांनी घेतला लाडकी बहीणचा लाभ!

## नवनीत राणा यांनी ठाकरे बंधूंना टोला

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात आगामी काळात मुंबई महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहे. यापार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीच्या चर्चांनी अधिकच जोर धरला आहे. यादरम्यान, भाजपाच्या नेत्या व अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी ठाकरे बंधूंना टोला लगावला आहे.**



बाळासाहेब ठाकरे यांचे जेव्हा निधन झाले, तेव्हा राज आणि उद्धव हे एकत्र आले असते तर त्यांच्या विचारधारेचा संदेश समाजात गेला असता, पण तसे न करता ते आज एकत्र येत असल्याने त्यातून एकच स्वार्थ दिसत आहे”, अशी टीका नवनीत राणा यांनी केली. “परिवार एकत्र येणे ही आपली संस्कृती असून ती आपण जपली पाहिजे. पण आज दोघे बंधू फक्त सत्ता आणि खुर्चीसाठी एकत्र येत आहेत. ठाकरे परिवार हे मजबुरीचे नाव झालेले आहे”, असेही त्या म्हणाल्या. यापूर्वीही नवनीत राणा यांनी ‘मजबुरी का नाम ठाकरे परिवार’ याच दृष्टीने या दोन्ही नेत्यांकडे बघितले जात असल्याची टीका केली होती. त्यांच्या या टीकेला आता मनसे आणि ठाकरे गटाचे नेते कसे उत्तर देणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. दिग्दर्शक आणि ज्येष्ठ अभिनेते महेश कोठारे यांनी सोमवारी एका कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे तोंडभरून कौतुक केले. मी मोदीजींचा आणि भाजपाचा भक्त आहे, असे विधानही त्यांनी यावेळी केले. इतकेच नव्हे तर मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपाचेच कमळ फुलणार, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला होता. यादरम्यान शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांन महेश कोठारे यांना सल्ला दिला. “महेश कोठारे नक्की मराठीच आहेत ना? मला शंका वाटते. प्रत्येकाला आपापले मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे, पण तुम्ही कलाकार आहात आणि तुमचे चित्रपट फक्त भारतीय जनता पार्टीच्याच लोकांनी बघितले नाहीत”, असे राऊत यांनी म्हटले आहे. दरम्यान, महेश कोठारे यांनी याआधीही अंबरनाथमधील एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे पुत्र श्रीकांत शिंदे यांचे कौतुक केले होते, त्यावेळी ठाकरे गटातील काही नेत्यांनी त्यांच्यावर टीका केली होती. मराठा समाजाला कुणबी नोंदीच्या आधारे जातीचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी महायुतीने सरकारने काही महिन्यांपूर्वी शासकीय अध्यादेश लागू केला. या अध्यादेशात हैदराबाद गॅझेटच्या अधिसूचनेचाही समावेश आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी या निर्णयाला तीव्र विरोध केला असून ते जीआर रद्द करण्याची सातत्याने मागणी करीत आहेत. त्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी संताप व्यक्त करीत भुजबळ यांना लक्ष्य केले आहे. “हैदराबाद गॅझेटसंदर्भातील जीआर आता कुणीही रद्द करू शकत नाही. मराठवाड्यातील सर्व मराठा बांधवांना कुणबी नोंदीच्या आधारे आरक्षणाचा लाभ मिळणार आहे. भुजबळ हे फक्त जातीय भेदभाव पसरवत आहेत. त्यांनी बीडमधील घेतलेल्या महाएल्गार सभेला कुणीही प्रतिसाद दिलेला नाही. त्याउलट आमच्या घोंगडी बैठकीला उभे राहायला सुद्धा जागा नव्हती”, असा टोला जरांगे यांनी लगावला आहे. छगन भुजबळ हे दिवाळीतला ठसकी फटाका असल्याचेही जरांगे यांनी म्हटले आहे.गेल्या वर्षभरात तब्बल १२ हजार ४३१ पुरुषांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. दी इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भात दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जावर उत्तर देताना सरकारकडून ही माहिती देण्यात आली आहे. विशेष म्हणजे लाभार्थी पुरुषांकडून अद्याप पैशांच्या वसुलीसंदर्भात कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याचे सांगण्यात आले आहे. राज्य सरकारच्या महिला व बालकल्याण विभागाने दिलेल्या माहितीनुसारत्याचबरोबर एकूण ७७ हजार ९८० अपात्र महिला लाभार्थ्यांनाही यादीतून वगळण्यात आले आहे. विशेष म्हणजे या पुरुष व महिला लाभार्थ्यांनी गैरव्यवहार करून अनुक्रमे १२ व १३ महिने योजनेचा लाभ पदरात पाडून घेतल्याचं स्पष्ट झाले आहे.

## आपापल्या प्रचाराची तयारी सुरू

म्हणजेच, जवळपास वर्षभर दर महिन्याला मिळणारे १५०० रुपये या अपात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होत होते. यातून सरकारी तिजोरीला पुरुष लाभार्थ्यांसाठी २४.२४ कोटी तर अपात्र महिला लाभार्थ्यांमुळे १४०.२८ कोटींचा भुर्दंड बसला आहे. बिहारमध्ये पुढील महिन्यात दोन टप्प्यात विधानसभा निवडणूक होणार आहे. यापार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी आपापल्या प्रचाराची तयारी सुरू केली आहे.

# मोठ्या संख्येने उत्तर भारतीय गावी निघाले

## मध्य रेल्वेच्या विविध स्थानकांतून 1,998 विशेष रेल्वेगाड्या

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**छठपूजेनिमित्त मुंबई, पुण्यावरून उत्तर आणि पूर्व भारतात जाण्यासाठी मोठ्या संख्येने प्रवासी निघाले आहेत. प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेवरून १,९९८ रेल्वेगाड्यांचे नियोजन केले आहे. यामधून तब्बल ३० लाख उत्तर भारतीय प्रवास करू शकतील. सध्या मुंबई, पुण्यासह मध्य रेल्वेच्या विविध स्थानकांतून ७०५ रेल्वेगाड्या धावल्या असून यामधून १०.६८ लाख उत्तर आणि पूर्व भारतीय प्रवाशांनी प्रवास केला.**

दिवाळी-छठ पुजेनिमित्त भारतीय रेल्वे १२,०११ विशेष रेल्वेगाड्या चालवत आहे. यामध्ये मध्य रेल्वेद्वारे १,९९८ आरक्षित आणि अनारक्षित रेल्वेगाड्या चालविण्याचे नियोजन आहे. या रेल्वेगाड्या बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या राज्यात जात आहेत. मुंबईतून ६०० हून अधिक रेल्वेगाड्या चालवण्यात आल्या.तर, दररोज १०० नियमित आणि ८ ते १० विशेष रेल्वेगाड्या चालवण्यात येत आहेत. २६ ऑक्टोबर रोजी २४ रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत. दररोज बिहारला जाणाऱ्या २२ अतिरिक्त विशेष रेल्वेगाड्या चालवल्या जात आहेत, अशी माहिती मध्य




रेल्वेचे महाव्यवस्थापक विजय कुमार यांनी दिली.सीएसएमटी येथे १,२०० चौमीचे तात्पुरत्या स्वरुपास विश्रांतीगृह तयार करण्यात आले असून यामध्ये सामानासह सुमारे १,५०० प्रवासी बसू शकतात. एलटीटीमध्ये १० हजार चौमीचे तात्पुरत्या स्वरुपास विश्रांतीगृह तयार करण्यात आले असून १० हजारांहून अधिक प्रवाशांना सामावून घेऊ शकेल. प्रवाशांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी दादर येथे ४७, सीएसएमटी येथे ९०, एलटीटी ७० आणि कल्याण ६६ येथे अतिरिक्त आरपीएफ आणि रेल्वे पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. बिहारला जाणाऱ्या रेल्वेगाड्यांच्या सुरक्षेसाठी ६० अतिरिक्त कर्मचारी तैनात आहेत.उत्तर आणि पूर्व भारतात जाणाऱ्या एकूण प्रवाशांपैकी ५८ टक्क्यांपेक्षा जास्त प्रवासी उत्तर प्रदेश आणि बिहारमधील आहेत. हे प्रवासी मुंबई, पुणे, नागपूरवरून रेल्वे प्रवास करीत आहेत. राजस्थान, दिल्लीकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्याही अधिक आहे. प्रवाशांची जास्तीत जास्त सोय होण्यासाठी सीएसएमटी, पुणे, नागपूर, भुसावळ आणि संख्येने रेल्वेगाड्या सोडण्याचे नियोजन आहे.

## ६०० हून अधिक रेल्वेगाड्या

तसेच फलाटावरील गर्दीचे नियोजन करण्यासाठी विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. रेल्वेगाड्यांसाठी फलाट निश्चित करण्यात आले आहेत.या रेल्वेगाड्या बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या राज्यात जात आहेत. मुंबईतून ६०० हून अधिक रेल्वेगाड्या चालवण्यात आल्या.

**कोळंबी उद्योगाला फटका**

## भारत नवा पर्याय शोधण्याच्या तयारीत

# टॅरिफचा कोळंबी उद्योगाला फटका

### पर्यायी बाजारपेठ म्हणून ऑस्ट्रेलिया



।मुंबई।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयातशुल्क (टॅरिफ) धोरणांचा अनेक देशांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेक देशांवर आयातशुल्क लादलेलं आहे. यामध्ये भारताचाही समावेश आहे. भारतावर एकूण ५० टक्के आयातशुल्क लादलेलं आहे. याचा फटका भारतालाही सहन करावा लागत असून सर्वाधिक फटका भारतातील कोळंबी उद्योगाला बसत आहे. मात्र, यावर आता भारत नवा पर्याय शोधण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे.**

अमेरिकेच्या आयात शुल्कामुळे कोळंबी उद्योगाला फटका बसत असल्याने भारत आता पर्यायी बाजारपेठ म्हणून ऑस्ट्रेलियाकडे पाहत आहे. या अनुषंगानेच आंध्र प्रदेश राज्याचे आयटी आणि मानव संसाधन विकास मंत्री आणि मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांचे पुत्र एन लोकेश नायडू यांनी म्हटलं आहे की ऑस्ट्रेलियन सरकार कोळंबीच्या आयातीवरील निर्बंध कमी करू शकते. त्यामुळे कोळंबी उद्योगाला अमेरिकेला पर्यायी बाजारपेठ म्हणून ऑस्ट्रेलियाकडे पाहिलं जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.एन लोकेश नायडू यांनी म्हटलं की, “भारतीय सीफूड निर्यातदारांसाठी ऑस्ट्रेलिया सकारात्मक आहे. तसेच भारतीय आणि ऑस्ट्रेलियन सरकारांनी केलेल्या व्यापक चर्चानंतर भारतीय कोळंबीसाठी पहिली आयात मंजुरी देण्यात आली आहे. एकाच बाजारपेठेवर जास्त अवलंबून राहण्याऐवजी आणि स्वतःला वाचवण्यासाठी आपण नवीन बाजारपेठा उघडत राहिल्या पाहिजेत”, असं नायडू यांनी म्हटलं आहे.दरम्यान, विशेष अभ्यागत कार्यक्रमांतर्गत सात दिवसांच्या दौऱ्यावर गेलेल्या एन लोकेश नायडू यांनी म्हटलं की, “ते ऑस्ट्रेलियन सीफूड असोसिएशनच्या सदस्यांशी भेटले आहेत, जेणेकरून राज्याच्या निर्यातदारांना अमेरिकेच्या शुल्कादरम्यान नवीन बाजारपेठा शोधण्यात मदत होईल. तसेच विद्यापीठातील नेते, सीईओ आणि काही तेथील मंत्र्यांना भेटून आंध्र प्रदेशातील तरुणांसाठी संधी उपलब्ध होतील. ऑस्ट्रेलियाच्या कृषी, मत्स्यव्यवसाय आणि वनीकरण विभागाने सशर्तपणे प्रतिबंधित नसलेल्या वस्तू आयात करण्यासाठी तयारी दर्शवली आहे”, असंही त्यांनी सांगितलं.देशाच्या कोळंबी निर्यातीपैकी ८० टक्के आणि सागरी निर्यातीपैकी ३४ टक्के आंध्र प्रदेशातून होतात. ज्याचं मूल्य दरवर्षी सुमारे २१,२४६ कोटी रुपये आहे. राज्यातील कोळंबी निर्यात आणि संबंधित व्यवसायांवर ३० लाखांहून अधिक लोक अवलंबून आहेत. दरम्यान, १५ सप्टेंबर रोजी आंध्र प्रदेश सरकारने सांगितलं की ट्रम्प यांच्या शुल्कामुळे राज्याला कोळंबी निर्यातीत अंदाजे २५,००० कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे.अमेरिकेच्या आयात शुल्कामुळे कोळंबी उद्योगाला फटका बसत असल्याने भारत आता पर्यायी बाजारपेठ म्हणून ऑस्ट्रेलियाकडे पाहत आहे. या अनुषंगानेच आंध्र प्रदेश राज्याचे आयटी आणि मानव संसाधन विकास मंत्री आणि मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांचे पुत्र एन लोकेश नायडू यांनी म्हटलं आहे की ऑस्ट्रेलियन सरकार कोळंबीच्या आयातीवरील निर्बंध कमी करू शकते. त्यामुळे कोळंबी उद्योगाला अमेरिकेला पर्यायी बाजारपेठ म्हणून ऑस्ट्रेलियाकडे पाहिलं जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.एन लोकेश नायडू यांनी म्हटलं की, “भारतीय सीफूड निर्यातदारांसाठी ऑस्ट्रेलिया सकारात्मक आहे. तसेच भारतीय आणि ऑस्ट्रेलियन सरकारांनी केलेल्या व्यापक चर्चानंतर भारतीय कोळंबीसाठी पहिली आयात मंजुरी देण्यात आली आहे.

### आयातीवरील निर्बंध कमी करू

एकाच बाजारपेठेवर जास्त अवलंबून राहण्याऐवजी आणि स्वतःला वाचवण्यासाठी आपण नवीन बाजारपेठा उघडत राहिल्या पाहिजेत”, असं नायडू यांनी म्हटलं आहे.दरम्यान, विशेष अभ्यागत कार्यक्रमांतर्गत सात दिवसांच्या दौऱ्यावर गेलेल्या एन लोकेश नायडू यांनी म्हटलं की, “ते ऑस्ट्रेलियन सीफूड असोसिएशनच्या सदस्यांशी भेटले आहेत, जेणेकरून राज्याच्या निर्यातदारांना अमेरिकेच्या शुल्कादरम्यान नवीन बाजारपेठा शोधण्यात मदत होईल.

# ट्रम्प यांची भारतातील तंत्रज्ञ, विद्यार्थ्यांना भेट

## एच-1बी व्हिसाप्रमाणे भरमसाठ शुल्क भरावे लागणार नाही



।मुंबई।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**अमेरिकेतील हजारो भारतीय व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांना मोठा दिलासा देत ट्रम्प प्रशासनाने एकाअर्थी दिवाळीची भेट दिली आहे. मागच्या महिन्यात डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने एच-१बी व्हिसावरील शुल्क १ लाख अमेरिकी डॉलर्स एवढे वाढवले होते. हा निर्णय भारतासाठी मोठा धक्का असल्याचे मानले गेले.**

भारतातून अनेक विद्यार्थी आणि तंत्रज्ञ अमेरिकेत शिक्षण आणि नोकरीसाठी जात असतात. आता ट्रम्प प्रशासनाने नियमात सुस्पष्टता आणली असून आधीपासूनच अमेरिकेत असलेल्या पदवीधरांना हे शुल्क भरावे लागणार नसल्याचे जाहीर करण्यात आले आहे. ज्यांच्याकडे आधीपासूनच एच-१बी व्हिसा आहे त्यांना मागच्या महिन्यात जाहीर करण्यात आलेले भरमसाठ शुल्क भरण्याची गरज नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. व्हिसासाठीचे पैसे कुणी भरायचे आहेत? कसे भरायचे? आणि नेमके हे शुल्क कुणाकुणाला माफ केले आह? याची सर्व माहिती यूएससीआयएस पोर्टलवर देण्यात आली आहे.ट्रम्प यांनी सप्टेंबरमध्ये व्हिसा शुल्कात वाढ केल्यानंतर अनेक आठवडे गोंधळ उडाला होता. तांत्रिकदृष्ट्या कुशल विदेशी कर्मचाऱ्यांना कामावर घेणाऱ्या कंपन्यांना वर्षाला एक लाख डॉलर अर्थात भारतीय चलनात ९० लाख रुपये शुल्क भरावे लागणार होते. हे शुल्क २१ सप्टेंबरच्या मध्यरात्री लागू करण्यात आले. ज्यामुळे भारतीय कर्मचारी, अमेरिकन कंपन्या आणि इमिग्रेशन वकिलांमध्ये घबराट पसरली.यूएस सिटीझनशिप अँड इमिग्रेशन सर्व्हिसेस (USCIS) ने ताज्या मार्गदर्शक सूचनांमध्ये म्हटले आहे की, अमेरिकेत आधीच वैध व्हिसावर असलेल्या कुणालाही नवे शुल्क लागू होणार नाही. यामध्ये एफ-१ विद्यार्थी व्हिसा धारक, एल-१ कंपनी अंतर्गत हस्तांतरण झालेले, नूतनीकरण आणि मुदतवाढ मिळवू इच्छिणारे सध्याचे एच-१बी व्हिसा धारक यांचा समावेश आहे.USCIS च्या नवीन सूचनांनुसार, एफ-१ विद्यार्थी व्हिसाधारकांना आणि एल-१ अंतर्गत येणाऱ्या व्यावसायिकांना एच-१बी व्हिसासाठी लागू केलेले शुल्क भरावे लागणार नाही. एफ-१ व्हिसाच्या माध्यमातून अमेरिकेतील कॉलेज,शैक्षणिक संस्थेत, प्रशिक्षण कार्यक्रमात पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेश करण्याची परवानगी दिली जाते.

### व्हिसा धारकांना दिलासा

अमेरिकन सरकारने मान्यता दिलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत प्रवेश मिळवणे बंधनकारक असते.अमेरिकेने १९९० साली एच-१बी व्हिसा कार्यक्रम सुरू केला. यामुळे जगभरातील कुशल मनुष्यबळ अमेरिकेला मिळाले आणि त्यांनी तेथील तंत्रज्ञान क्षेत्रात मोलाचे योगदान दिले.

# ‘अलबत्या गलबत्या’ करणार विश्वविक्रम



प्रायोगिक, व्यावसायिक नाट्यसृष्टीच्या युगात सध्याच्या घडीला लहान मुलांसाठी काही विशेष नाटकं रंगभूमीवर आली आणि या नाटकांनी लहानांसोबत मोठ्यांचीही मने जिंकली. ‘अलबत्या गलबत्या’ हे नाटकही त्यापैकीच एक. रत्नाकर मतकरी लिखित हे नाटक रंगभूमीवर आणण्याचं शिवधनुष्य निर्माते राहुल भंडारे यांनी उचलले आणि या बालनाट्यानं इतिहास घडवला. तुफान लोकप्रियता मिळवणारं ‘अलबत्या गलबत्या’ नाटक आता एका नव्या विश्वविक्रमासाठी सज्ज झालं आहे.झी मराठी प्रस्तुत आणि अद्वैत थिएटर निर्मित ‘अलबत्या गलबत्या’ या नाटकाची टीम येत्या स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला सलग ६ प्रयोग करत मराठी बालरंगभूमीच्या इतिहासात पहिल्यांदाच जागतिक विक्रम करण्यासाठी सज्ज झाले आहेत. सकाळी ७.०० ते रात्री १०.३० यावेळेत हे ६ विश्वविक्रमी प्रयोग दादरच्या श्री शिवाजी मंदिर मध्ये रंगणार आहेत.मराठी रंगभूमीवर ‘मैलाचा दगड’ ठरलेल्या या नाट्यकृतीचा अशा प्रकारचा प्रयोग कलाकार, तंत्रज्ञ या सर्वांनाच एक मोठं आव्हान असलं तरी कलावंतांना हा नाट्यानुभव खूप काही शिकवणारा असेल असं मत निर्माते राहुल भंडारे यांनी व्यक्त केलं. हा भव्य नाट्यपट एकाच दिवशी, एकाच थिएटरमध्ये एकापाठोपाठ बघणं म्हणजे नाट्यरसिकांसाठी पर्वणीच आहे. या सलग नाट्यानुभवाच्या संकल्पनेला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून या नाटकाची जोरदार तिकीटविक्री सुरु झाली आहे. स्वातंत्र्यदिनी स्वातंत्र्याचा आनंद अधिक द्विगुणित करायचा असेल तर छत्रपती शिवाजी मंदिर ट्रस्ट यांच्या सहयोगाने ‘अलबत्या गलबत्या’ नाटकाचे होणारे हे सलग प्रयोग अजिबात चुकवू नका. अनेक विक्रमांना गवसणी घालत ‘अलबत्या गलबत्या’ बालनाट्याची घौडदौड सुरू आहे. कोविडचा काळ सोडला तर ६ वर्षात ८०० प्रयोगांचा टप्पा पार केला आहे आणि विक्रमी १००० व्या प्रयोगाकडे वाटचाल सुरू आहे.

# निक्कीचा राग अनावर



‘बिग बॉस मराठी’च्या घरात पहिल्या दिवसापासूनच अनेक कमाल गोष्टी घडत आहेत. सदस्यांना अडचणीत आलेलं पाहून ‘बिग बॉस’प्रेमींना मात्र मजा येत आहे. ‘बिग बॉस’ने सदस्यांच्या तोंडचं पाणी पळवलं आहे. सदस्यांचं पाणी बंद केल्यानंतर आणि त्यांना उपाशी ठेवल्यानंतर आता ‘बिग बॉस’ने सदस्यांना जमिनीवर आणलं आहे. वर्षा उसगांवकरांमुळे जमिनीवर झोपावं लागणार असल्याने निक्की तांबोळीचा राग अनावर झालेला आजच्या भागात पाहायला मिळेल. ‘बिग बॉस मराठी’च्या पहिल्या दिवशी काहीही काम नसल्याने वर्षा उसगांवकर झोपल्या होत्या. त्यामुळे त्यांच्यासकट घरातील इतर सदस्यांनाही ‘बिग बॉस’ने शिक्षा दिलेली आजच्या भागात प्रेक्षकांना पाहायला मिळेल.

‘बिग बॉस मराठी’च्या नव्या प्रोमोमध्ये ‘बिग बॉस’ म्हणत आहेत,”आपल्याला बेडचा वापर करण्याची परवानगी नाही”. ‘बिग बॉस’च्या या आदेशानंतर घरातील सर्व सदस्य चिंतेत येतात. वर्षा उसगांवकर ‘बिग बॉस’ला म्हणाल्या,”चुकून झालं”. त्यावर पारा चढलेली निक्की म्हणते,”आम्हाला भोगावं लागतंय..तुमच्यामुळे आता आम्हाला जमिनीवर झोपावं लागतंय”. यावर वर्षा म्हणतात,”माझ्या एकटीमुळे नाही”. त्यावर निक्की म्हणते,”तुम्ही झोपला होतात तेव्हा तुमची अक्कल कुठे गेली होती”. निक्कीला शांत करत वर्षा ताई म्हणतात,”आरडाओरडा करू नको”. तरीही निक्की शांत बसत नाही उलट त्यांना प्रतिउत्तर देत त्यांनाच शांत बसण्यास सांगते. ‘बिग बॉस मराठी’च्या घरातील सदस्यांना आता बेडचा वापर करता येणार नाही. निक्की आणि वर्षाताईंचा चढलेला पारा ‘बिग बॉस’ प्रेमींना मनोरंजनाची मेजवानी देणारा ठरेल. तर ‘बिग बॉस’च्या घरातील सदस्यांना जमिनीवर झोप लागेल का? हे पाहण्यासाठी आजचा

# विकी कौशलच्या फोनचा वॉलपेपर होतोय व्हायरल

बॉलीवूड सुपरस्टार विकी कौशल आणि कतरिना कैफ इंडस्ट्रीमधील लोकप्रिय कपल आहे. दोघांना आदर्श कपल अशी उपमा दिली जाते. या कपलचे चाहते सोशल मीडियावर त्यांचे व्हिडीओ शेअर करत असतात. आता विकी-कॅटच्या चाहत्यांनी एका व्हिडीओमध्ये एक अशी गोष्ट पाहिली आहे की ज्याची चर्चा सध्या सगळीकडेच सुरू आहे.विकीचा आगामी चित्रपट ‘बॅड न्यूज’ लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या प्रमोशन्सदरम्यान विकीने सोशल मिडिया इन्फ्लूएन्सर रुही दोसानी हिच्याबरोबर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओत रुही विकीकडे ऑटोग्राफ मागायला जाताना दिसत आहे आणि तिने विकीकडे ऑटोग्राफसाठी पेन देताच तो पेनच बंद पडतो, अशी एक कॉमेडी रील दोघांनी शूट केली आहे. व्हिडीओच्या सुरूवातीला जेव्हा विकी त्याच्या फोनमध्ये व्यग्र असतो त्याच क्षणाला त्याच्या फोनमध्ये कतरिनाच्या बालपणीचा फोटो वॉलपेपर ठेवलेला दिसतो आणि संपूर्ण व्हिडीओमधील नेमका तो फोटो चाहत्यांनी पाहिला आणि आता हा फोटोदेखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.गेल्या काही महिन्यांपासून विकी आणि कतरिना गुडन्यूज देणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. पण विकी कौशलने याच चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च सोहळ्यात या अफवांना पूर्णविराम दिला होता. विकी म्हणाला होता की, ” आतासाठी आम्ही घेऊन येत असलेली बॅड न्यूज तुम्ही एन्जॉय करा, जेव्हा वेळ येईल तेव्हा आम्ही ती बातमी तुम्हाला नक्कीच देऊ.”दरम्यान, विकी कौशलच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, विकी शेवटचा ‘सॅम बहादूर’ या चित्रपटात दिसला होता.



मलायका

# ह्यांचं सगळं ओक्केमध्ये एकदम!

अरोरा आणि अर्जुन कपूर यांचं ब्रेकअप झाल्याच्या चर्चा सध्या सोशल मिडीयावर सुरु होत्या. या दोघांनी एकमेकांच्या नातेवाईकांना अनफॉलो केल्याने दोघांच्या ब्रेकअपच्या बातम्यांमध्ये खरंच काहीतरी तथ्य आहे, अशी चर्चा सुरु झाली. पण आता या सर्व अफवा असल्याचं समजतंय. आता हे दोघे सार्वजनिक ठिकाणी स्पॉट झाल्याने या सर्व अफवा असल्याचे स्पष्ट झाले आहे. ते अजूनही एकत्र आहेत आणि सर्व काही ठीक आहे. रविवारी अर्जुन आणि मलायका एकत्र स्पॉट झाले होते. रविवारी मुंबईत पाऊस पडत असताना मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर जेवणासाठी बाहेर गेले होते. दोघांनी एकत्र जेवण केले आणि जेव्हा दोघे बाहेर आले तेव्हा पापाराझींनी त्यांना स्पॉट केले. यादरम्यान दोघेही काही न बोलता थेट त्यांच्या गाडीत बसले. दोघांनाही असे एकत्र पाहून चाहत्यांनीही कमेंट बॉक्समध्ये प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली. काहींनी सांगितले की देवाचे आभार मानतात की दोघे एकत्र आहेत आणि त्यांचे ब्रेकअप झाले नाही. त्याचवेळी एका यूजरने मलायका अरोराच्या व्हाइट कलरच्या आऊटफिटचे कौतुक केले.

**हस्तांदोलन टाळले**

## कबड्डी संघानेही पाकिस्तानीशी हस्तांदोलनास नकार दिला

# कबड्डी संघानेही हस्तांदोलन टाळले!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**हलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले. त्यानंतर यूएन सारख्या आंतरराष्ट्रीय मंचावर पाकिस्तानला उघडे पाडले. खेळाच्या मैदानातही भारताने पाकिस्तानला जागा दाखवली.**

## भारताने पाकिस्तानला जागा दाखवली



आधी आशिया क्रिकेट स्पर्धा आणि त्यानंतर महिलांच्या क्रिकेट सामन्यात पाकिस्तानला पराभवाची धुळ चारली गेली. तसेच भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानच्या खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला. त्याची पुनरावृत्ती आता भारताच्या युवा कबड्डी संघानेही केली आहे. तिसऱ्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत भारताच्या तरूण कबड्डी संघाने आपल्या कामगिरीने पाकिस्तानला नमवलेच. शिवाय पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलनही टाळले. पाकिस्तानी संघाचा ८१-२६ असा दणदणीत पराभव केला. तत्पूर्वी नाणेफेकीदरम्यान कबड्डी संघाचा कर्णधार इशांत राठीने पाकिस्तानी कर्णधाराशी हस्तांदोलन करणे टाळले. आशियाई युवा क्रीडा स्पर्धा १९ ऑक्टोबर रोजी बहरीनमध्ये सुरू झाली होती. सामन्यापूर्वी हस्तांदोलन टाळण्याची नाट्यमय घटना घडल्यानंतरही भारतीय कबड्डी संघाने कोर्टवरही आपले वर्चस्व गाजवले. भारताने स्पर्धेच्या पहिल्या दिवशी बांगलादेशचा ८३-१९ आणि दुसऱ्या दिवशी श्रीलंकेचा ८९-१६ ने पराभव करून स्वतःला सिद्ध केले.सप्टेंबरमध्ये झालेल्या आशियाई क्रिकेट स्पर्धेत पहिल्यांदा हस्तांदोलनाचा वाद समोर आला. ७ सप्टेंबर रोजी झालेल्या सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवताच संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि शुभम दुबे हे पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन न करताच ड्रेसिंग रुमच्या दिशेने निघून गेले. तिथे गेल्यानंतर ड्रेसिंग रुमचा दरवाजा बंद करून घेण्यात आला. याचीच पुनरावृत्ती त्यानंतरच्या दोन सामन्यातही झाली. यानंतर महिला विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला क्रिकेट संघानेही पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन टाळले.आशियाई युवा क्रीडा स्पर्धा दर चार वर्षांनी आयोजित केली जाते. कबड्डीचा यंदा या स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. यंदाच्या स्पर्धेत २३ ऑक्टोबर रोजी अंतिम सामना खेळवला जाणार आहे. एकूण सात संघ यात सहभागी झाले आहेत.

प्रत्येक संघाचे सहा सामने होतील. भारत सध्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे.आधी आशिया क्रिकेट स्पर्धा आणि त्यानंतर महिलांच्या क्रिकेट सामन्यात पाकिस्तानला पराभवाची धुळ चारली गेली. तसेच भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानच्या खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला. त्याची पुनरावृत्ती आता भारताच्या युवा कबड्डी संघानेही केली आहे. तिसऱ्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत भारताच्या तरूण कबड्डी संघाने आपल्या कामगिरीने पाकिस्तानला नमवलेच.

शिवाय पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलनही टाळले. पाकिस्तानी संघाचा ८१-२६ असा दणदणीत पराभव केला. तत्पूर्वी नाणेफेकीदरम्यान कबड्डी संघाचा कर्णधार इशांत राठीने पाकिस्तानी कर्णधाराशी हस्तांदोलन करणे टाळले. आशियाई युवा क्रीडा स्पर्धा १९ ऑक्टोबर रोजी बहरीनमध्ये सुरू झाली होती. सामन्यापूर्वी हस्तांदोलन टाळण्याची नाट्यमय घटना घडल्यानंतरही भारतीय कबड्डी संघाने कोर्टवरही आपले वर्चस्व गाजवले.भारताने स्पर्धेच्या पहिल्या दिवशी बांगलादेशचा ८३-१९ आणि दुसऱ्या दिवशी श्रीलंकेचा ८९-१६ ने पराभव करून स्वतःला सिद्ध केले. सप्टेंबरमध्ये झालेल्या आशियाई क्रिकेट स्पर्धेत पहिल्यांदा हस्तांदोलनाचा वाद समोर आला. ७ सप्टेंबर रोजी झालेल्या सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवताच संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि शुभम दुबे हे पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन न करताच ड्रेसिंग रुमच्या दिशेने निघून गेले. तिथे गेल्यानंतर ड्रेसिंग रुमचा दरवाजा बंद करून घेण्यात आला. याचीच पुनरावृत्ती त्यानंतरच्या दोन सामन्यातही झाली.

### भारत सध्या अव्वल स्थानावर

यानंतर महिला विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला क्रिकेट संघानेही पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन टाळले.आशियाई युवा क्रीडा स्पर्धा दर चार वर्षांनी आयोजित केली जाते. कबड्डीचा यंदा या स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. यंदाच्या स्पर्धेत २३ ऑक्टोबर रोजी अंतिम सामना खेळवला जाणार आहे. एकूण सात संघ यात सहभागी झाले आहेत. प्रत्येक संघाचे सहा सामने होतील. भारत सध्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे.

# इंडिज संघाने एक अनोखा विक्रम नावे केला

## इंडिजने सर्व 50 षटकं केवळ फिरकी गोलंदाजांसह टाकली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वेस्ट इंडिज आणि बांगलादेश यांच्यात दुसरा वनडे सामना खेळवला जात आहे. हा सामना ढाका येथे सुरू आहे. बांगलादेश संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. यासह वेस्ट इंडिजने गोलंदाजीने सामन्याला सुरुवात केली. बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना ७ विकेट्स गमावत २१३ धावा केल्या. पण यादरम्यान वेस्ट इंडिज संघाने अनोखा विक्रम आपल्या नावे केला आहे.**



बांगलादेशने वेस्ट इंडिजला विजयासाठी २१४ धावांचं लक्ष्य दिलं आहे. तत्पूर्वी बांगलादेशच्या सर्व फलंदाजांनी धावसंख्येत योगदान दिलं. सैफ हसन ६ धावांवर बाद झाल्यानंतर सौम्य सरकारने ४५ धावांची खेळी केली.

याशिवाय मेहदी हसन मिराजने २१ तर रिशाद हुसैनने ३९ धावा केल्या. याशिवाय सर्व फलंदाजांनी १५-२० धावा करत योगदान दिलं आणि संघाची धावसंख्या २१३ पर्यंत नेली.वेस्ट इंडिजने एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात असा पराक्रम केला आहे, जो यापूर्वी कोणत्याही संघाने केलेला नाही. संघाकडून गुडाकेश मोतीने उत्कृष्ट गोलंदाजी करत तीन विकेट्स घेतल्या, तर ॲलिक अथानाझे आणि अकील हुसेन यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्याबांगलादेशच्या डावात, वेस्ट इंडिजने सर्व ५० षटकं केवळ फिरकी गोलंदाजांसह टाकली. एकदिवसीय क्रिकेट इतिहासात असा पराक्रम पहिल्यांदाच झाला आहे. यासह वेस्ट इंडिज संघाने हा वर्ल्ड रेकॉर्ड ही आपल्या नावे केला आहे. कॅरिबियन कर्णधार शे होपने ५० षटकं टाकण्यासाठी पाच गोलंदाजांना गोलंदाजी दिली, प्रत्येकाने १० षटकांचा स्पेल टाकला.

### दुसरा सामना महत्त्वाचा असणार

अकिल हुसेन, रोस्टन चेस, खारी पियरे, गुडाकेश मोती आणि अथानाझे यांनी मिळून ५० षटकं टाकली. वेस्ट इंडिजचे हे सर्व गोलंदाज फिरकीपटू आहेत.१८ ऑक्टोबरला बांगलादेशविरुद्ध झालेल्या पहिल्या वनडे सामन्यात ७४ धावांनी पराभव पत्करावा लागल्यानंतर वेस्ट इंडिजसाठी हा दुसरा सामना महत्त्वाचा असणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार।
। दि. 22 ऑक्टोबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## नॉव्हेल इंटरनॅशनल स्कूल"चा

# जिल्ह्यातील उत्कृष्ट शाळा पुरस्काराने गौरव!

### शिक्षण विश्व: विद्याभारती अखिल भारतीय शिक्षण संस्था पुणे यांच्या वतीने पुरस्कार प्रदान

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळांमध्ये राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांची दखल घेत विद्याभारती अखिल भारतीय शिक्षण संस्था पुणे यांच्या वतीने  नॉव्हेल इंटरनॅशनल स्कूल या पिंपरी चिंचवड मधील नामांकित संस्थेला ‘पुणे जिल्हा उत्कृष्ट शाळा पुरस्कार २०२५’ ने सन्मानित करण्यात आले.**




हा पुरस्कार सोहळा विद्याभारती, अखिल भारतीय शिक्षण संस्था, पुणे यांच्या वतीने ग.दि. माडगूळकर सभागृह, आकुर्डी येथे मोठ्या दिमाखात पार पडला. या कार्यक्रमाला केरळ राज्याचे राज्यपाल  राजेंद्र जी अर्लेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी डॉ. सुरेश जाधव, मुकुंदराव कुलकर्णी,रघुनाथ देवकर यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने नॉव्हेल इंटरनॅशनल स्कूल मार्फत विद्यार्थ्यांच्या सृजनशीलता, आत्मविश्वास, कौशल्य विकास व सामाजिक जाणीवेच्या दृष्टिकोनातून विविध उपक्रम राबवले जातात. कला संलग्न शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण, क्रीडा व विज्ञान विषयक स्पर्धा, पर्यावरण जनजागृती, स्वच्छ भारत अभियान, प्रकल्प आधारित शिक्षण हे उपक्रम विशेष उल्लेखनीय आहेत. विद्यार्थ्यांना अनुभवाधिष्ठित आणि आनंददायी शिक्षण देण्याचा संस्थेचा प्रयत्न सातत्याने सुरु आहे. असे संस्थापक अध्यक्ष आमदार अमित गोरखे यांनी सांगितले.

पुरस्कार स्वीकारण्यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आमदार अमित गोरखे , विलास जेऊरकर ,विद्यालय व्यवस्थापक डॉ. प्रिया गोरखे , नॉव्हेल कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयाचे प्राचार्य वैभव फंड आणि मुख्याध्यापिका मृदुला  गायकवाड, उपस्थित होते.

## “डी.एस.के कुंजबन”मध्ये जागवला राष्ट्रप्रेमाचा जागर!

### “एक दिवा हुतात्म्यासाठी” उपक्रमाने भारतीय सैन्यांप्रति कृतज्ञता

### विधायक उपक्रमातून दिवाळी साजरी करण्याचा प्रयत्न

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवाळीनिमित्त लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पुनावळे येथील डी.एस.के. कुंजबन सोसायटीतील “शौर्य स्थळ”वर आयोजित करण्यात आलेल्या “एक दिवा हुतात्म्यासाठी” या कार्यक्रमात देशासाठी बलिदान दिलेल्या वीर शहीदांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. या कृतज्ञता कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**



या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी, यशवंत इन्फिनिटी सोसायटीचे ज्येष्ठ नागरिक तसेच कुंजबन सोसायटीचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे, या उपक्रमाची कल्पना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची, नियोजन यशवंत इन्फिनिटी सोसायटीच्या ज्येष्ठ नागरिक संघाचे, तर आयोजन कुंजबन सोसायटीच्या सभासदांचे होते. या त्रिसंवादातून साकारलेला उपक्रम राष्ट्रप्रेमाचे प्रतिक ठरला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने समाजसेवक श्री. राहुल काटे, माजी सैनिक संघाचे अध्यक्ष “कारगिल समर सेनानी” रामदास मदने, भारतीय थल सेना निवृत्त अधिकारी बाळकृष्ण सुर्वे, भारतीय वायु सेना निवृत्त अधिकारी रत्नाकर करंकाळ, एससीजी कमांडो माजी अधिकारी चंद्रकांत कडलग, यांच्यासह माजी सैनिक उपस्थित होते.  श्री. पवार आणि श्री. किशोर यांनी सादर केलेल्या देशभक्तिपर आणि भक्तिगीतांनी वातावरण भारावून टाकले. यावेळी माजी सैनिक संघटनेचे मावळ-मुळशी तालुकाध्यक्ष श्री. रामदास मदने, श्री. रत्नाकर करंकाळ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे श्री. देशपांडे, श्री. सोनार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या जोशी यांनी संयमीत पद्धतीने पार पडले, तर कुंजबन सोसायटीचे चेअरमन अधिकराव दिवे-पाटील यांनी आभार प्रदर्शन करत कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शैलेश पाचपुते, हित गुप्ता, संजय थोरात यांनी परिश्रम घेतले. हुतात्म्यांच्या स्मृती जागवल्या... कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व गणेश वंदना यांनी झाली.

### दिवाळीच्या निमित्ताने विशेष दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन

# स्वच्छता कर्मचाऱ्यांचे काम अविस्मरणीय - संदीप वाघेरे

## समाजासाठी अहोरात्र सेवा देणाऱ्या 200 पेक्षा अधिक आरोग्य कर्मचाऱ्यांचा सन्मान



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी येथील नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वतीने प्रभाग क्रमांक २१ मधील आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दिवाळीच्या निमित्ताने विशेष दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन ज्येष्ठ नागरिक संस्था हॉल येथे करण्यात आले.**

समाजासाठी अहोरात्र सेवा देणाऱ्या २०० पेक्षा अधिक आरोग्य कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करत त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली.

कार्यक्रमामध्ये आरोग्य निरीक्षक धनेश्वर थोरवे, पी. व्ही. कांबळे, उमेश कांबळे, तसेच सामाजिक कार्यकर्ते शेखर अहिरराव, हनुमंत वाघेरे, संदीप वाघेरे, गोविंदा वाघेरे, राघवेंद्र भांडगे, शुभम वाघेरे, सचिन वाघेरे, किरण शिंदे, अर्जुन राठोड आदींची उपस्थिती लाभली.

संदीप वाघेरे म्हणाले, “आपण सर्वांनी गेल्या काही वर्षांत आरोग्य कर्मचाऱ्यांचं काम जवळून पाहिलं आहे. कोरोना काळात यांनी जीव धोक्यात घालून काम केलं. त्यांचे योगदान अविस्मरणीय आहे. दिवाळीचा सण आपण आनंदाने साजरा करतो, पण हे कर्मचारी त्या काळातही आपल्या कर्तव्यात रुजू असतात. त्यांच्या कष्टाचे आपण कायम ऋणी आहोत.” कार्यक्रमामध्ये सर्व कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळ व भेटवस्तू देण्यात आले आणि त्यांच्याशी संवाद साधून त्यांचे मनोबल वाढवण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत सौहार्दपूर्ण आणि आत्मीय वातावरणात पार पडलेVV

# पुनावळेतील गायकवाड नगरमध्ये रस्त्याचे काम पूर्ण!

## सामाजिक कार्यकर्ते रोहीत काटे यांच्या प्रयत्नांना यश



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुनावळे परिसरातील गायकवाड नगर (प्रदीप स्वीट्स ते जी.के. आरकॉन रस्ता) येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे काम यशस्वीरित्या पूर्ण झाले असून, या कामासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे स्थानिक सामाजिक कार्यकर्ते रोहीत काटे यांचे विशेष योगदान राहिले आहे. त्यांच्या सातत्यानं केलेल्या पाठपुराव्यामुळे आणि नागरिकांच्या सहकार्यामुळे हे काम अपेक्षित दर्जाने पूर्ण झाल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.**

सुरुवातीच्या टप्प्यात रस्त्याच्या कामात अनियमितता, अर्धवट पायाभरणी आणि गुणवत्तेचा अभाव दिसून आला होता. त्यामुळे नागरिकांनी तक्रार करून महानगरपालिकेकडे निवेदन दिलं होतं. या निवेदनाला दुजोरा देत रोहीत काटे यांनी महापालिकेचे आयुक्त, स्थानिक अधिकारी आणि जनप्रतिनिधींशी सातत्याने संवाद साधत कामाची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी प्रभावी भूमिका बजावली.

रोहीत काटे यांनी सांगितले, “रस्त्याच्या कामात सुरुवातीला काही त्रुटी होत्या, पण नागरिकांच्या तक्रारी योग्य होत्या आणि त्यावर तातडीने लक्ष देणं गरजेचं होतं. महापालिकेने योग्य प्रतिसाद दिला, त्यामुळे आज दर्जेदार रस्ता नागरिकांच्या सेवेत आहे, हे समाधानकारक आहे.”

नवीन रस्त्यामुळे आता परिसरात धूळमुक्त आणि सुरक्षित वाहतुकीस चालना मिळाली आहे. स्थानिकांनी याबद्दल आनंद व्यक्त करत महापालिकेचे तसेच रोहीत काटे यांचे आभार मानले आहेत. यापुढे परिसरात पदपथ, वृक्षलागवड, योग्य स्ट्रीटलाइट व्यवस्था यावरही भर द्यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. पुनावळे परिसरात शहराच्या इतर भागांप्रमाणे दर्जेदार पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी रोहीत काटे यांचा पुढाकार, जनतेशी संवाद आणि प्रशासकीय यंत्रणेशी समन्वयाचे काम उल्लेखनीय ठरले आहे.

> “ नागरिकांचा आवाज वेळेवर पोचवला गेला आणि प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला, ही लोकशाहीची ताकद आहे. आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील विकासकामांमध्येही नागरिकांचा सहभाग आणि गुणवत्तेची हमी यावरच भर देणार आहोत.
>
> -- **रोहीत काटे,** सामाजिक कार्यकर्ते

## सफाई कामगारांना दिवाळी फराळाचे वाटप

# स्वच्छतेचे दीप प्रज्वलित करणाऱ्या हातांचा "सन्मान"

### उन्नती सोशल फाउंडेशन, पिंपळे सौदागर तर्फे उपक्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि वाटण्याचा सण. समाजातील प्रत्येक घटकाला या आनंदात सामील करण्याच्या हेतूने उन्नती सोशल फाउंडेशन, पिंपळे सौदागर तर्फे सफाई कामगारांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे समाजातील दुर्लक्षित घटकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत "स्वच्छतेचे खरे दीप प्रज्वलित करणाऱ्या हातांना" सन्मान देण्याचा संदेश देण्यात आला.**



या उपक्रमामागील संकल्पना विषद करताना उन्नती सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ.सौ. कुंदाताई संजय भिसे म्हणाल्या, "दिवाळी हा केवळ सण नसून, समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात आनंदाचा प्रकाश पसरवण्याची संधी आहे. सफाई कामगार हे आपल्या शहराच्या स्वच्छतेचे खरे रक्षक आहेत. त्यांच्यामुळेच आपण स्वच्छ, सुंदर वातावरणात दिवाळी साजरी करू शकतो. म्हणूनच या दिवाळीत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उन्नती सोशल फाउंडेशनतर्फे फराळ वाटपाचा हा उपक्रम राबवण्यात आला. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपापल्या परीने अशा सेवाभावी घटकांचा सन्मान करावा, हीच खरी दिवाळीची भावना आहे."
या उपक्रमात फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. फराळ वाटपाच्या वेळी सफाई कामगारांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसत होते.
याप्रसंगी, विठाई वाचनालय चे सभासद, आनंद हास्य क्लबचे सभासद ,ऑल सिनियर सिटीजन्स असोसिएशनचे सर्व सभासद, लिनिअर गार्डन जेष्ठ नागरिक संघाचे सदस्य पिंपळे सौदागर परिसरातील नागरिक बंधू-भगिनी आदी उपस्थित होते.

## पिंपरी पालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी मोनिका ठाकुर!

### जांभळे पाटील यांच्या बदलीचा आदेश येण्यापूर्वीच ठाकूर यांची नियुक्ती; प्रशासनात संभ्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांचा तीन वर्षांचा नुकताच कार्यकाळ पूर्ण झाला आहे. मात्र, त्यांच्या बदलीचा अद्याप कोणताही आदेश शासनाकडून आला नाही. तत्पूर्वीच मोनिका ठाकुर यांची अतिरिक्त आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.**




याबाबतचा आदेश महसूल व वन विभागाचे उपसचिव महेश वरूडकर यांनी जारी केला आहे. जांभळे-पाटील यांची बदली झाली नसताना ठाकुर यांचा आदेश आल्यामुळे प्रशासनामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. नुकतीच पालिका आयुक्त शेखर सिंह यांची कुंभमेळा आयुक्तपदी नियुक्ती झाली. शेखर सिंह यांनी तीन वर्ष दोन महिने पालिकेचा कारभार पाहिला. तीन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यामुळे त्यांची बदली होणार हे निश्चित झाले होते त्याप्रमाणे त्यांची बदली झाली. दरम्यान जांभळे पाटील यांचीही कारभाराची तीन वर्षे पूर्ण झाल्याने त्यांची बदली होणार याची चर्चा रंगली आहे. असे असताना मोनिका ठाकूर यांची नियुक्ती अतिरिक्त आयुक्तपदी करण्यात आली आहे मात्र त्यांची नियुक्ती कोणाच्या जागी झाले हे स्पष्ट नाही. जांभळे पाटील यांच्या बदली आदेश येण्यापूर्वी ठाकूर यांची नियुक्ती झाल्याने प्रशासनात संभ्रम निर्माण झाला आहे.

#### सहायक आयुक्त शिंदे यांची बदली

महापालिका निवडणूक विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांची पदोन्नतीने नागपूर येथे अपर जिल्हाधिकारी या पदावर सोमवारी (दि. २०) बदली झाली. त्यांच्याकडे नागपूर विभागातील प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. याबाबतचा आदेश महसूल व वन विभागाचे उपसचिव महेश वरुडकर यांनी जारी केला आहे. शिंदे यांच्याकडे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभाग आणि निवडणूक विभाग या दोन्ही महत्त्वाच्या विभागाची जबाबदारी होती. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आगामी महापालिका निवडणुकीसाठी प्रभागरचना तयार करण्यात आली आहे. तसेच मतदार याद्यांचे कामकाज देखील त्यांनी सुरू केले होते. अशातच त्यांची पदोन्नतीने बदली झाल्यामुळे निवडणूक विभागाचे कामकाज कोणाकडे दिले जाणार, हे पाहणेदेखील महत्त्वाचे ठरणार आहे.

# दिपावली सणाचे महत्त्व व साजरी करण्याची परंपरा!

**'दिपावली' म्हणजे दिव्यांचा, प्रकाशाचा आणि आनंदाचा सण. भारतात प्रत्येक घराघरात साजरा होणारा आणि सर्व धर्मांतील लोक आनंदाने सामील होणारा एक अत्यंत महत्वाचा सण म्हणजे दिवाळी. याला धार्मिक, सामाजिक, वैज्ञानिक आणि अध्यात्मिक महत्त्व आहे. या लेखातून आपण या सणाचे संपूर्ण महत्त्व, परंपरा आणि बदलत्या स्वरूपाचा मागोवा घेणार आहोत.**



**विशेष**

**कु. कल्पना प्रताप कर्पे**

दिपावली म्हणजेच 'दिव्यांची माळ'. यामागे एक संदेश आहे — अंध:कारावर प्रकाशाचा विजय. धार्मिक दृष्टिकोनातून पाहिल्यास या सणाशी अनेक पौराणिक कथांचा संबंध आहे. प्रभू श्रीराम वनवास संपवून अयोध्येत परतले, नरकासुराचा वध झाला, भगवान विष्णूने वामनावतार घेतला, महालक्ष्मी देवी प्रकट झाली, सम्राट विक्रमादित्याचा राज्याभिषेक झाला — या सर्व शुभ घटनांचा संबंध दिवाळीच्या पाच दिवसांशी आहे. त्यामुळेच हा सण फार मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो.

दिपावली सणाची सुरुवात वसुबारस या दिवसाने होते. या दिवशी गाईचे पूजन केले जाते कारण गाईला सर्व देवतांची माता मानले जाते. त्यानंतर धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि शेवटी भाऊबीज — असे पाच दिवस साजरे होतात. प्रत्येक दिवसाला वेगवेगळं धार्मिक व सामाजिक महत्त्व आहे.

या सणाचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यामागचा वैज्ञानिक दृष्टिकोन. दिवाळी सण सूर्याच्या दक्षिणायन स्थितीत येतो. या काळात रात्र मोठी आणि दिवस लहान असतो. त्यामुळे प्रकाश कमी असतो. म्हणूनच अंधाराचा नाश करण्यासाठी दिवे लावले जातात. ही परंपरा केवळ धार्मिक नव्हे, तर पूर्णपणे वैज्ञानिक आधारही असलेली आहे.

अध्यात्मिक दृष्टिकोनातून दिवाळीचा अर्थ खूप खोल आहे. 'दीप' म्हणजे प्रकाश आणि प्रकाश म्हणजे ज्ञान. अज्ञानरूपी अंधार दूर करून आत्मज्ञानाचा प्रकाश मिळवणे — हेच या सणाचं मूळ उद्दिष्ट आहे. म्हणून नवरात्रीपासून दिवाळीपर्यंतचा काळ उपासना, साधना आणि आत्मविकासासाठी उपयुक्त मानला जातो.



परंपरेनुसार दिवाळीच्या काळात घराची स्वच्छता केली जाते, अंगाला उटणे लावून स्नान केले जाते, रांगोळ्या काढल्या जातात, आकाशकंदील लावले जातात, मातीच्या पणत्या प्रज्वलित केल्या जातात. घराघरात गोडधोड फराळाचे पदार्थ तयार केले जातात आणि ते नातेवाईक, शेजारी यांच्यात वाटले जातात. लहान मुले अंगणात मातीचे किल्ले बनवतात, दिव्यांची आरास करतात आणि खेळता खेळता सांस्कृतिक वारसा जपत असतात.

परंतु आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीने आणि तंत्रज्ञानाच्या अति वापरामुळे या सणाच्या स्वरूपात बरेच बदल झाले आहेत. मातीच्या पणत्यांऐवजी विद्युत दिवे आले, घरगुती फराळाऐवजी रेडीमेड मिठाई व स्नॅक्स आले, कागदी रांगोळ्या आल्या, उटण्याऐवजी केमिकलयुक्त सौंदर्यप्रसाधने आली. पूर्वीचा उत्साह, आत्मियता आणि सामाजिक बंध आता कमी होत चालले आहेत. लोक एकमेकांना भेटण्याऐवजी फक्त मेसेज किंवा व्हॉट्सॲपवर शुभेच्छा पाठवून समाधान मानतात. फराळ वाटणं, एकत्र येणं, सणाचा एकत्र अनुभव घेणं या गोष्टी फारशा उरलेल्या नाहीत. परिणामी सण आहे, पण त्यातला 'आनंद' हरवलेला जाणवतो.

आज आपल्यावर जबाबदारी आहे की या बदलत्या काळातही आपली धार्मिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक मूल्यं आपण जपली पाहिजेत. आपल्या पुढच्या पिढीला या सणामागील खरी परंपरा आणि मूल्यं समजावून सांगितली पाहिजेत. दिवाळी म्हणजे केवळ फटाके फोडण्याचा किंवा सुट्टी घालवण्याचा सण नाही, तर एकत्र येण्याचा, आनंद साजरा करण्याचा, नातेसंबंध दृढ करण्याचा, आणि आत्मज्ञानाच्या प्रकाशात न्हालेलं जाण्याचा एक पवित्र कालावधी आहे. या लेखाच्या माध्यमातून माझा एकच प्रयत्न आहे – आपण पुन्हा एकदा दिवाळी सणाचं खरे महत्त्व समजून, तो पूर्वीसारख्या आनंदाने, उत्साहाने आणि श्रद्धेने साजरा करावा. आपला पारंपरिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवावा. ही दिपावली आपणा सर्वांसाठी सुख, समाधान आणि समृद्धी घेऊन येवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

शुभ दिपावली!